# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीची मतमोजणी आज होत आहे. काही ठिकाणचे कल हाती येण्यास सुरुवात झाली आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं गोंधळातच मतमोजणीला सुरुवात झाली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मतमोजणीच्या ठिकाणी पोलीसांकडून लाठीमार करण्यात आला. यात माजी महापौर विकास जैन यांना मार बसला. या गोंधळाबद्दल पालकमंत्री संजय शिरसाट यांची कन्या हर्षदा शिरसाट यांनी निषेध नोंदवला. तसंच संजय शिरसाठ यांनी लाठीमारामध्ये जखमी झालेल्यांसह छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांची भेट घेऊन घटनेची माहिती घेतली. दरम्यान, पहिल्या फेरीअखेर भारतीय जनता पक्ष १२, शिवसेना सहा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष पाच, एमआयएम पाच, काँग्रेस तीन, राष्ट्रवादी काँग्रेस एक, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे.

****

लातूर महानगरपालिकेत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी बहुमताकडे वाटचाल करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. एकूण सत्तर जागांपैकी हाती आलेल्या निकालापैकी २९ जागांवर काँग्रेसनं विजय मिळवला आहे. १२ जागांवर भाजप आणि वंचित बहुजन आघाडीने सर्व पाच जागांवर विजय मिळाला.

****

जालना महापालिकेत आतापर्यंत जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपनं २०, काँग्रेस तीन शिवसेनेनं एक, तर एक जागा अपक्ष उमेदवारानं जिंकली आहे. प्रभाग एक आणि पाच मध्ये सर्व भाजपचे उमेदवार विजयी झाले.

****

परभणीमध्ये भाजप ११, शिवसेना दोन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पाच, काँग्रेस नऊ, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १५ जागांवर आघाडीवर आहे. तर नांदेड-वाघाळा महानगरपालिकेत महायुती आघाडीवर, आणि त्यापाठोपाठ काँग्रेसनं आघाडी घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

रायगड जिल्ह्यात पनवेल महापालिकेतल्या ७८ जागांपैकी २२ जागांचे निकाल हाती आले असून, सतरा जागांवर भाजप, काँग्रेस एक, शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्ष एक आणि शेतकरी कामगार पक्षाने तीन जागांवर विजय मिळवला आहे.

****

मुंबईत दहिसर इथल्या प्रभाग क्रमांक दोन मधून भाजपच्या उमेदवार तेजस्वी घोसाळकर विजयी झाल्या.

****

पुण्यात प्रभाग क्रमांक २० मध्ये भाजपचे तीन, तर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक उमेदवार विजयी झाला.

****

धुळे महानगरपालिका प्रभाग क्रमांक एक मधून भाजपचे चारही उमेदवार विजयी झाले.

****

मालेगाव महापालिकेत प्रभाग क्रमांक सतरा मध्ये इस्लाम पक्षाला मोठा विजय मिळाला. या प्रभागात पक्षाचे चारही उमेदवार निवडून आल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

****

कोल्हापूर महानगरपालिकेत भाजपचे आठ, काँग्रेसचे तीन, शिवसेना एक, तर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक उमेदवार विजयी झाला.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन

पद्धतीने अर्ज भरता येणार असून, पाच फेब्रुवारीला मतदान तर सात फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

देशातल्या नवउद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या स्टार्टअप इंडिया या उपक्रमाला आज दहा वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचं होत आहे.

१६ जानेवारी २०१६ रोजी पंतप्रधान मोदी यांनी या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजपर्यंत भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता मिळाली आहे. २०१४ नंतर दीड लाखांपेक्षा जास्त नवीन उपक्रम सुरु झाले, सुमारे साडे १७ लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था ठरला आहे.

****

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं हज यात्रेकरुंना नियमांची पूर्तता करण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यावर्षी यात्रेकरुंसाठी ही निवड अंतिम असून, यानंतर कुठल्याही परिस्थितीत ती पुन्हा वाढवली जाणार नाही, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. वाढवलेल्या मुदतीत यात्रेकरुंनी आपल्या प्रवासासाठी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, आपली पारपत्रं भारतीय हज समितीकडे किंवा संबंधित यात्रा आयोजकांकडे दाखल करावी, असे निर्देशही मंत्रालयानं दिले आहेत.

****

नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारीला होणाऱ्या 'हिंद-दी-चादर' या श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या साडेतीनशेव्या हौतात्म्य दिनानिमित्त राज्य शासनाच्या शिक्षण विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. यासोबतच शाळांच्या नित्य परिपाठात श्री गुरु तेग बहादुर यांच्या शौर्यावर आधारित गीतांचं गायन तसंच जीवनपट दाखवण्यात येणार आहे.

****